Impact Factor - 6.625

E-ISSN - 2348-7143

SHIVAJI COLLEGE • HINGOLI •

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

## International E-Research Journal

PEER REFREED & INDEXED JOURNAL

October-November-December 2020

Vol. 7 Issue 4



Chief Editor -
Dr. Dhanraj T. Dhangar,
Assist. Prof. (Marathi)
MGV's Arts & Commerce College,
Yeola, Dist - Nashik [M.S.] INDIA

Executive Editors :
Prof. Tejesh Beldar, Nashikroad (English)
Dr. Gajanan Wankhede, Kinwat (Hindi)
Mrs. Bharati Sonawane, Bhusawal (Marathi)
Dr. Rajay Pawar, Goa (Konkani)

This Journal is indexed in :

- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Dictionary of Research Journal Indexing (DRJI)
- www.worldcat.org
- Cosmos Impact Factor (CIF)
- Global Impact Factor (GIF)
- International Impact Factor Services (IIFS)

For Details Visit To : www.researchjourney.net

SWATIDHAN PUBLICATIONS

45

SHIVAJI COLLEGE HINGOLI

**Impact Factor – 6.625** **E-ISSN – 2348-7143**

**INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S**

# RESEARCH JOURNEY

**International E-Research Journal**

**PEER REFREED & INDEXED JOURNAL**

**October-November-December 2020**

**Vol. 7 Issue 4**

Chief Editor -
Dr. Dhanraj T. Dhangar
Assist. Prof. (Marathi)
MGV's Arts & Commerce College,
Yeola, Dist - Nashik [M.S.] INDIA

Executive Editors :
Prof. Tejesh Beldar, Nashikroad (English)
Dr. Gajanan Wankhede, Kinwat (Hindi)
Mrs. Bharati Sonawane, Bhusawal (Marathi)
Dr. Rajay Pawar, Goa (Konkani)

*Our Editors have reviewed papers with experts' committee, and they have checked the papers on their level best to stop furtive literature. Except it, the respective authors of the papers are responsible for originality of the papers and intensive thoughts in the papers. Nobody can republish these papers without pre-permission of the publisher.*

*- Chief & Executive Editor*

**SWATIDHAN INTERNATIONAL PUBLICATIONS**

For Details Visit To : www.researchjourney.net

Cover Photo : Hathras Rape Case (U.P. India) Source : Internet

© All rights reserved with the authors & publisher

Price : Rs. 1000/-

Assistant Professor
Shivaji College, Hingoli.
Tq.& Dist.Hingoli.(MS.)

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal
Impact Factor - (SJIF) - 6.625 (2019),
Vol. 7, Issue 4
Peer Reviewed Journal

E-ISSN : 2348-7143
Oct.-Nov.-Dec. 2020

## Editorial Board

**Chief Editor -**
Dr. Dhanraj T. Dhangar,
Assist. Prof. (Marathi)
MGV's Arts & Commerce College,
Yeola, Dist – Nashik [M.S.] INDIA

**Executive Editors :**
Prof. Tejesh Beldar, Nashikroad (English)
Dr. Gajanan Wankhede, Kinwat (Hindi)
Mrs. Bharati Sonawane, Bhusawal (Marathi)
Dr. Rajay Pawar, Goa (Konkani)

**Co-Editors -**

- **Prof. Mohan S.** - Dean faculty of Arts, Delhi University, **Delhi, India**
- **Prof. Milena Brotaeva** - Head, Classical East Department, Sofia University, **Sofia, Balgeria**
- **Dr. R. S. Sarraju** – Center for Translation Studies, University of Hydeabad, **Hydrabad, India**
- **Mr.Tufail Ahmed Shaikh**- King Abdul Aziz City for Science & Technology, Riyadh, **Saudi Arabia.**
- **Dr. Anil Dongre** - Head, Deptt. of Management, North Maharashtra University, Jalgaon **[M.S.] India**
- **Dr. Shailendra Lende** - R.T.M. Nagpur University, Nagpur **[M.S.] India**
- **Dr. Dilip Pawar** - BoS Member (SPPU), Dept. of Marathi, KTHM College, Nashik. **[M.S.] India**
- **Dr. R. R. Kazi** - North Maharashtra University, Jalgaon **[M.S.] India**
- **Prof. Vinay Madgaonkar** - Dept. of Marathi, Goa University, **Goa, India**
- **Prof. Sushant Naik** - Dept. of Konkani, Govt. College, Kepe, **Goa, India**
- **Dr. G. Haresh** - Associate Professor, CSIBER, Kolhapur **[M.S.] India**
- **Dr. Munaf Shaikh** - N. M. University, Jalgaon & Visiting Faculty M. J. C. Jalgaon **[M.S.] India**
- **Dr. Sanjay Kamble** -BoS Member Hindi (Ch.SU, Kolhapur), T.K. Kolekar College, Nesari **[M.S.]**
- **Prof. Vijay Shirsath**- Nanasaheb Y. N. Chavhan College, Chalisgaon **[M.S.] India**
- **Dr. P. K. Shewale** - Vice Principal, Arts, Science, Commerce College, Harsul **[M.S.] India**
- **Dr. Ganesh Patil** - M.V.P.'s, SSSM, ASC College, Saikheda, Dist. Nashik **[M.S.] India**
- **Dr. Hitesh Brijwasi** - Librarian, K.A.K.P. Com. & Sci. College, Jalgaon **[M.S.] India**
- **Dr. Sandip Mali** - Sant Muktabai Arts & Commerce College, Muktainagar **[M.S.] India**
- **Prof. Dipak Patil** - S.S.V.P.S.'s Arts, Sci. and Com. College, Shindhkheda **[M.S.] India**

**Advisory Board -**

- **Dr. Marianna Kosic** - Scientific-Cultural Institute, Mandala, **Trieste, Italy.**
- **Dr. M.S. Pagare** - Director, School of Languages Studies, North Maharashtra University, Jalgaon
- **Dr. R. P. Singh** - Professor of English, University of Lucknow **[U.P.] India**
- **Dr. S. M. Tadkodkar** - Rtd. Professor & Head, Dept. of Marathi, Goa University, **Goa, India.**
- **Dr. Pruthwiraj Taur** - Chairman, BoS., Marathi, S.R.T. University, Nanded.
- **Dr. N. V. Jayaraman** - Director at SNS group of Technical Institutions,**Coimbatore**
- **Dr. Bajarang Korde** - Savitribai Phule Pune University **Pune, [M.S.] India**
- **Dr. Leena Pandhare** - Principal, NSPM's LBRD Arts & Commerce Mahila Mahavidyalaya, Nashik Road
- **Dr. B. V. Game** - Principal, MGV's Arts and Commerce College, Yeola, Dist. Nashik.

**Review Committee -**

- **Dr. J. S. More** – BoS Member (SPPU), Dept. of Hindi, K.J.Somaiyya College, Kopargaon
- **Dr. S. B. Bhambar,** BoS Member Ch.SU, Kolhapur, T.K. Kolekar College, Nesari
- **Dr. Uttam V. Nile** - BoS Member (NMU, Jalgaon) P.S.G.V.P. Mandals ACS College, Shahada
- **Dr. K.T. Khairnar**– BoS Member (SPPU), Dept. of Commerce, L.V.H. College, Panchavati
- **Dr. Vandana Chaudhari** KCE's College of Education, Jalgaon
- **Dr. Sayyed Zakir Ali ,** HoD, Urdu & Arabic Languages, H. J. Thim College, Jalgaon
- **Dr. Sanjay Dhondare** – Dept. of Hindi, Abhay Womens College, Dhule
- **Dr. Amol Kategaonkar** – M.V.P.S.'s G.M.D. Arts, B.W. Commerce & Science College, Sinnar.

**Published by –**
© Mrs. Swati Dhanraj Sonawane, Director, Swatidhan International Publication, Yeola, Nashik
Email : swatidhanrajs@gmail.com **Website :** www.researchjourney.net **Mobile :** 9665398258

Assistant Professor
Hingoli.
(MS.)

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal
Impact Factor - (SJIF) - 6.625 (2019),
Vol. 7, Issue 4
Peer Reviewed Journal
E-ISSN : 2348-7143
Oct.-Nov.-Dec. 2020

# INDEX


| No. | Title of the Paper | Authors' Name | Page No. |
|---|---|---|---|
| 1 | Gods and Mythologies of Greece and India – The Similarities | Dr. Ganesh Chavan | 06 |
| 2 | Understanding the Female and the Feminine in Vyasa's Mahabharata | Bhavya Arora | 08 |
| 3 | Similarity in the Iliad and the Ramayana | Dr. Ganesh Chavan | 12 |
| 4 | Feminism : A Protest Against Men? | Miss. Akshata Pansare | 17 |
| 5 | Domestic Violence in Marital Relationship in the Novel 'Mother of 1084' : A Pragma-Stylistic Study | Preeti Kaushal | 20 |
| 6 | 'Tardy Dreams' of Black Americans in Lorraine Hansberry's 'A Raisin in the Sun' | Dr. Tabassum Inamdar | 27 |
| 7 | Grey Literature : An Important Resource | Dr. Anuja Kastikar | 32 |
| 8 | The Contribution of the Dalit Writers, Artists and Singers in the Enrichment of Dalit Literature | Rajesh Kose | 38 |
| 9 | Study the Correlation between Attitude towards Women Empowerment and Gender Equality among Junior College Level Students | Dr. Jayashri Nemade | 44 |
| 10 | Impact of COVID-19 on Indian Economy | Dr. Pramodini Navale (Kadam) | 51 |
| 11 | The Psychological Impact of COVID -19 | Dr. Ranjita Jadhav | 54 |
| 12 | Stepping Back to Move Ahead : Overcoming Pandemic and Achieving Sustainability | Sumedha Dwivedi | 57 |
| 13 | Spatial Pattern of Cropping Intensity in Western Satpura Region of India | Dr. Lalit Sandanshiv | 62 |
| 14 | Wild Vegetables Used by the Tribes K.H Wildlife Sanctuary | Dr. Sangita Dandwate | 67 |
| 15 | 'CONNECT': A Model Proposing Social Outreach of Higher Education Institutions | Dr. Ravidra Singh | 70 |
| 16 | To Study Thermogravimetric Stability of two Commercial Samples | Dr. Rupali Gulalkari | 74 |
| 17 | Best Cost Entry Method for the Solution of Transportation Problem | Dr. Kishor Ingale, Dr. D. D. Pawar | 79 |
| 18 | Examination of Physico-Chemical Properties of Water of Chorkund Lake, Chorkund. District: Yavatmal.(M.S.).India | C. R. Kasar | 84 |
| 19 | Importance of E-Resources in Research Work | Yogesh Bhadane | 88 |
| 20 | Critical Analysis of Financial Aspects of Selected NACC Societies | Dr. B. S. Salunkhe | 91 |
| 21 | A Study of Children's Rights Awareness among Primary School Teachers and Students | Dr. Kunda Baviskar | 97 |
| | **हिंदी विभाग** | | |
| 22 | भाषा का जैविक आधार | प्रो. मोहन | 102 |
| 23 | संत कबीर की प्रासंगिकता | डॉ. सुनील व्यवहारे | 112 |
| 24 | श्री.गुरु ग्रंथ साहिब जी में निहीत मानव-मूल्य | राजिंदरकौर महाजन | 117 |
| 25 | हिंदी सन्त परम्परा और रैदास | डॉ. सुनील व्यवहारे | 121 |




Tq.& Dist.Hingoli.(MS.)

48

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal | E-ISSN : 2348-7143
Impact Factor - (SJIF) - 6.625 (2019), Vol. 7, Issue 4 | Oct.-Nov.-Dec. 2020
Peer Reviewed Journal


| | | | |
|---|---|---|---|
| 26 | प्रेमचंदयुगीन हिन्दी कथा-साहित्य में ग्राम्यजीवन | डॉ. भिमराव मानकरे | 125 |
| 27 | प्रेमचंद की कहानियों में दलित चेतना | डॉ. परविंदरकौर महाजन | 129 |
| 28 | धनगर जनजातियों में सामाजिक एवं सांस्कृतिक स्थितियों में परिवर्तन के संकेत | डॉ.गणपत राठोड | 132 |
| 29 | दिनकर के काव्य में राष्ट्रीय चेतना | डॉ.महेंन्द्रसिंग पवार | 136 |
| 30 | बीसवी सदी के अंतिम दशक का साहित्य : भाषा व शिल्प | डॉ. संतोष पवार | 140 |
| 31 | हिंदी में अनुदित दलित मराठी आत्मकथाओं में चित्रित समस्याएँ | डॉ.भारत खिलारे | 144 |
| 32 | वेदना एकाकीपन की : कृष्णा सोबती की नज़र में | डॉ. संतोष पवार | 152 |
| 33 | नारी समस्या और कृष्णा सोबती के उपन्यास | अनिता देवी | 158 |
| 34 | ज्ञानप्रकाश विवेक की ग़ज़लों में व्यक्त जीवन-दर्शन | डॉ. जे.व्ही.पाटील, अनिल सूर्यवंशी | 163 |
| 35 | 'दरमियाना' में किन्नरों की राजनैतिक चेतना | डॉ. विलास कांबळे | 169 |
| 36 | 'मुन्नी मोबाईल' - कॉल सेंटरों में कार्यरत युवाओं के काले जीवन की कहानी | डॉ.सन्मुख मुच्छटे | 176 |
| | **मराठी विभाग** | | |
| 37 | लोकसाहित्य – अक्षर वाङ्मय | डॉ. व्यंकटेश पोटफोडे | 180 |
| 38 | लोकतत्त्व व इहवादाचा अनुबंध | स्वाती लवंगे, डॉ. दिलीप पवार | 186 |
| 39 | भिल्ल जमातीच्या संस्कृतीतील होळी : एक सण | डॉ. चांगदेव मुंढे | 193 |
| 40 | ओतारी समाजातील विवाहपद्धती | प्रा.विक्रम ओतारी | 198 |
| 41 | आदिवासी बोलीभाषा : वास्तव आणि आव्हाने | डॉ. सुलतान पवार | 202 |
| 42 | श्रीचक्रधरस्वामींचे व्यक्तिदर्शन | डॉ.अंजली पांडे | 208 |
| 43 | पसायदान : एक आकलन (२) | डॉ. पुरुषोत्तम जुन्ने | 212 |
| 44 | सामाजिक क्रांतीच्या युगस्त्री : क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले | डॉ.श्रीकांत गायकवाड | 218 |
| 45 | सोपान खुडे ह्यांचे नाटक 'सम्राट अशोक' | राहुल गायकवाड | 226 |
| 46 | भारत सासणे यांच्या कथेतील जीवनदर्शन | डॉ. बाबाराव ठावरी | 231 |
| 47 | मराठी कथेची उत्क्रांती | डॉ. तीर्थराज कापगते | 236 |
| 48 | 'रानसय' मधून व्यक्त होणारे ग्रामवास्तव | प्रा. ज्ञानेश्वर मुंढे | 244 |
| 49 | कामगार कवितेतील सामाजिक जाणिवा : एक दृष्टिक्षेप | डॉ. दिलीप पवार | 248 |
| 50 | ल. सी. जाधवांच्या कादंबऱ्यांचे आशयसूत्र व त्यांचे वेगळेपण | मिनाक्षी गोणारकर | 253 |
| 51 | तौलनिक साहित्य आणि आंतरविद्याशाखीय अभ्यास | डॉ. प्रकाश जाधव | 258 |
| 52 | डॉ. दादा गोरे यांचे कथाविश्व | डॉ. पुरुषोत्तम जुन्ने | 261 |
| 53 | 'डाळ' : एक ग्रामीण कादंबरी | डॉ. रावसाहेब ननावरे | 268 |
| 54 | मराठी साहित्य आणि मानसशास्त्र परस्पर संबंध | डॉ. भास्कर शेळके | 271 |
| 55 | भिल्ल संस्कृतीतील काही प्रतीके | डॉ. चांगदेव मुंढे | 280 |
| 56 | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे मानवकल्याणविषयक आर्थिक विचार | प्रा.विलास सोळुंके | 284 |
| 57 | 'स्वच्छ भारत मिशन' योजनेचे तात्त्विक अधिष्ठान | डॉ. पंडित लावंड | 290 |
| 58 | 'आत्मनिर्भर भारत अभियान' : एक विश्लेषणात्मक अभ्यास | डॉ. रामदास मुकटे | 296 |
| 59 | 'कोविड १९' चा भारताच्या वाहन उद्योग व जी.एस.टी.संकलनावरील परिणाम | डॉ. शामराव वायसे | 301 |
| 60 | जालना जिल्ह्यातील बदनापूर तालुक्यामधील ग्रामीण विकासात शेततळ्यांची भूमिका - एक भौगोलिक अभ्यास | डॉ. रंजीता जाधव | 306 |


Assistant Professor
Shivaji College, Hingoli.
Tq & Dist Hingoli (M.S.)



49

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal | E-ISSN : 2348-7143
Impact Factor - (SJIF) - 6.625 (2019), Vol. 7, Issue 4 | Oct.-Nov.-Dec. 2020
Peer Reviewed Journal


| | | | |
|---|---|---|---|
| 61 | व्हऱ्हाड प्रांतातील राजकीय स्थित्यंतरे (प्राचीन काळ) | डॉ. धिरजकुमार नजान | 312 |
| 62 | वाचन वृद्धीसाठी महाविद्यालयातील नाविन्यपूर्ण विविध उपक्रम | प्रा. उमेश गावंडे | 318 |
| 63 | नाशिकच्या कुंभमेळ्यातील संज्ञापन प्रक्रिया व साधने | डॉ. उज्ज्वला बर्वे, संपत देवगिरे | 322 |
| 64 | 'हावठण' : कुंबार समाजाची संघर्शगाथा (कोंकणी भाषेतील शोधनिबंध) | ग्लिनिस डायस | 332 |
| | उर्दू विभाग | | |
| 65 | اُردو اور ہندوستانیت | ڈاکٹر سید اصفیہ مدنی زکریہ | 340 |
| 66 | سیّد مہدی حسن احسن لکھنوی، اردو کے اہم ڈرامہ نگار | مقالہ نگار & رشیدالنساءمحمّد یوسف | 343 |


*Our Editors have reviewed papers with experts' committee, and they have checked the papers on their level best to stop furtive literature. Except it, the respective authors of the papers are responsible for originality of the papers and intensive thoughts in the papers. Nobody can republish these papers without pre-permission of the publisher.*

***- Chief & Executive Editor***

**Published by –**
© Mrs. Swati Dhanraj Sonawane, Director, Swatidhan International Publication, Yeola, Nashik
Email : swatidhanrajs@gmail.com Website : www.researchjourney.net Mobile : 9665398258

Assistant Professor
Shivaji College, Hingoli.
Tq.& Dist. Hingoli.(MS.)



50

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal
Impact Factor - (SJIF) – 6.625 (2019),
Vol. 7, Issue 4
Peer Reviewed Journal
E-ISSN : 2348-7143
Oct.-Nov.-Dec. 2020

# 'आत्मनिर्भर भारत' अभियान एक विश्लेषणात्मक अभ्यास :

**प्रा. डॉ रामदास धो.मुकटे**
शिवाजी महाविद्यालय हिंगोली महाराष्ट्र

**प्रस्तावना**

भारताचे पंतप्रधान नरेंद्र भाई मोदी यांनी 12 मे2020 रोजी कोविड-19 विषाणूजन्य संसर्ग रोगामुळे भारतीय अर्थव्यवस्थेतील झालेल्या विविध क्षेत्राचे नुकसान दूर करून महामारीच्या या संकटात भारताला आत्मनिर्भर करण्याची गरज लक्षात घेऊन, 20 लाख कोटी रुपयांचे आर्थिक पॅकेज जाहीर केले या पॅकेजला 'आत्मनिर्भर भारत अभियान'असे नाव देण्यात आले. अभियानाचा मुख्य उद्देश भारताला आत्मनिर्भर बनवणे हा आहे. पंतप्रधान मोदी यांच्या मते 'याअभियानामुळे भारतातील लोकांना मोठ्या प्रमाणात रोजगार उपलब्ध होईल,येणाऱ्या काही वर्षांमध्ये भारत जीवनावश्यक वस्तू पैकी बहुसंख्य वस्तूंचे उत्पादन करेल आणि स्वतः आत्मनिर्भर होईल'.या आधारावरच या अभियानाला आत्मनिर्भर भारत असे नाव देण्यात आले आहे.

"आत्मनिर्भर म्हणजे कोणत्याही वस्तू व सेवा बाबतीत दुसऱ्यावर अवलंबून न राहता स्वतःसाठी स्वतःच्या वस्तू व सेवांची उपलब्ध साधनांच्या मदतीने निर्मिती करणे होय."

आत्मनिर्भर हा विषय भारतासाठी नवीन नाही. कारणभारतीय अर्थव्यवस्थेचा इतिहास बघितला तर दिसून येते की,भारत हा स्वातंत्र्यपूर्व कालखंडात स्वयंपूर्ण होता त्यात प्रत्येक गाव-खेडे आत्मनिर्भर होते.आवश्यक असणाऱ्या सर्व वस्तू व सेवा यांचे उत्पादन भारतातच केले जात होते.एक दुसऱ्यावर अवलंबून राहण्याची आवश्यकता नव्हती, त्यामुळे देशातील प्रत्येक व्यक्ती सुखी आणि समृद्ध होता. भारत हा एक उद्योग प्रदेश देश होता कारण उद्योग व्यवसायात काम करणाऱ्या लोकांची संख्या देशात मोठे होती.भारताचा आंतरराष्ट्रीय व्यापार मुक्त होता. व्यापार तोल हाअधिकयाचा होता. कापड,ताग,मसाल्याचे पदार्थ अशा अनेक वस्तूंची निर्यात मोठ्या प्रमाणात केल्या जात होती.मुक्त व्यापारामुळेच ब्रिटिश भारतात व्यापार करण्यासाठी आले परंतु व्यापारी म्हणून ते भारतात यशस्वी होऊ शकले नाही तेव्हा त्यांनी आपला मोर्चा राजकीयक्षेत्रांकडे वळवला आणि त्यामध्ये ते यशस्वी झाले ब्रिटिशांनी एकशे पन्नास वर्षे भारतावर राज्य केले.या कालखंडात ब्रिटिशांनी एका बाजूनी भारतातील चालू असले उद्योग बंद पाडण्याचा प्रयत्न केला आणि दुसऱ्या बाजूने नवीन उद्योगांची उभारणी केली नाही.त्याचा परिणाम भारतातील लघु,कुटीर आणि अनेक मोठे उद्योग बंद पडले.देशात बेकारी,दारिद्र्य यामध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झाली आणि भारताची स्वयंपूर्णता संपुष्टात आली.भारत अनेक वस्तू-सेवांसाठी दुसऱ्या देशांवर अवलंबून राहू लागला आणि भारत हा मागास देश म्हणून जगासमोर आला.

स्वातंत्र्य लढ्यामध्ये ही महात्मा गांधी यांनी स्वयंपूर्ण खेड्यांची संकल्पना मांडली आणि स्वयंपूर्ण खेड्यांच्या निर्मितीवर भर दिलेला आहे. त्याचबरोबर स्वदेशीचा स्वीकार करून कुटीर- लघु उद्योगांच्या विकासावर भर दिला.त्यासाठी संपूर्ण भारतामध्ये स्वयंपूर्णते बाबतीत प्रचार आणि प्रसार त्यांनी केला आणि



Assistant Professor
Shivaji College,Hingoli.
Tq.& Dist.Hingoli.(MS.)

51

महत्व समजून सांगितले.स्वातंत्र्य काळाततही देशाला स्वयंपूर्ण बनवण्याचा प्रयत्न प्रत्येक पंचवार्षिक योजनेमध्ये करण्यात आल्याचा दिसून येतो याचे एक फलित म्हणून आज भारत अन्नधान्य मध्ये स्वयंपूर्ण झाल्याचा दिसून येतो.

**संशोधनाची आवश्यकता :**

कोविड-19 च्या या संसर्गजन्य महामार्गामुळे भारतीय अर्थव्यवस्थेतील विविध क्षेत्राचे झालेले नुकसान दूर करण्याच्या उद्देशाने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 12मे 2020 रोजी 20 लाख कोटी रुपयांचे आर्थिक पॅकेज जाहीर केले. या पॅकेजचा लाभ अर्थव्यवस्थेतील विविध घटकाला कशा पद्धतीने होणार आहे,किती प्रमाणात निधी उपलब्ध करून देण्यात आलेला आहे. हे लक्षात घेण्याची आवश्यकता असल्यामुळे प्रस्तुत संशोधन कार्य करण्यात आले आहे.

**संशोधन पद्धती:**

प्रस्तुत संशोधन कार्यासाठी संशोधनाच्या द्वितीय पद्धतीचा उपयोग करण्यात आलेला आहे.संशोधनासाठी आवश्यक असणारी साधन सामग्री यामध्ये विषयासंदर्भातील यापूर्वी करण्यात आलेले लिखाण संशोधन माहितीचा आधार घेण्यात आला आहे. तसेच संदर्भ ग्रंथ, मासिकेयातून प्रकाशित झालेले लेख, दैनिक वर्तमानपत्र ऑनलाईन वृत्तपत्रे वृत्तवाहिन्या वेबसाईट याद्वारे उपलब्ध असलेली माहिती इत्यादींचा आधार घेण्यात आलाआहे व त्याआधारे प्रस्तुत संशोधन पूर्ण केले आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे:**

1) आत्मनिर्भर भारत अभियान या आर्थिक पॅकेजमध्ये अर्थव्यवस्थेतील विविध क्षेत्रात संदर्भात सरकारकडून केलेल्या संरचनात्मक बदलाचा आढावा घेणे.

2)आत्मनिर्भर भारत अभियानमध्ये विविध क्षेत्राला मिळणाऱ्या निधीचा आढावा घेणे.

3) आत्मनिर्भर अभियानामुळे अर्थव्यवस्थेतील विविध क्षेत्राला भविष्यात होणारे लाभ व एकूण अर्थव्यवस्थेच्या विकास मध्ये होणाऱ्या बदलाचा अभ्यास करणे.

**संशोधनाचे गृहिते :**

1) कोविंड-19 या संसर्गजन्य रोगामुळे भारतीय अर्थव्यवस्थेतील विविध क्षेत्राचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.

2)अर्थव्यवस्थेतील सर्वच नुकसानग्रस्त क्षेत्राला पुनर्जिवित करण्याचा प्रयत्न आत्मनिर्भर भारत योजनेअंतर्गत करण्यात आला आहे.

3) शासकीय धोरणांमध्ये संरचनात्मक बदल करून खाजगीकरणावर भर देण्यात आला आहे.



Assistant Professor
Shivaji College, Hingoli.
Tq.& Dist.Hingoli.(MS.)

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal
Impact Factor - (SJIF) – 6.625 (2019),
Vol. 7, Issue 4
Peer Reviewed Journal

E-ISSN : 2348-7143
Oct.-Nov.-Dec. 2020

**ग्रामीण अर्थव्यवस्था शेतकरी व कामगार :**

भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 12 मे 2020 रोजी जाहीर केलेल्या वीस लाख कोटी रुपयांच्या योजनेमध्ये अर्थव्यवस्थेतल्या शहरी व ग्रामीण अशा सर्व क्षेत्राचा विकास करून देशाला आत्मनिर्भरतेकडे नेण्याचा उद्देश समोर ठेवण्यात आला आहे. यामध्ये "सूक्ष्म,लघु आणि मध्यम उद्योगांसाठी 3लाख कोटी रुपये, शेतीसाठी 1लाख कोटी रुपये,शहरी गरिबांसाठी 11 हजार कोटी रुपये, ग्रामीण विकासाकरिता कृषी कर्ज आणि मनरेगा यासाठी 40 हजार कोटी रुपये व नाबार्ड बँकेला 30 हजार कोटी रूपये अशा प्रकारे भारताच्या अर्थमंत्र्यांनी वीस लक्ष कोटी रुपयांचा तपशील पाच टप्प्यात जाहीर केला आहे."1 भारतीय अर्थव्यवस्थेतील ग्रामीण क्षेत्र आणि शेतकरी म्हणजेच ग्रामीण विकासावर अधिक भर देण्यात आला आहे. जास्तीत जास्त पैसा करण्याचा पुरवण्याचा प्रयत्न या अभियानाच्या मदतीने केला आहे.कोविड-19 च्या या महामारीच्या काळात जास्तीत जास्त शेती क्षेत्र,शेतकऱ्यांचे व कामगार यांचे नुकसान मोठ्या प्रमाणात झाले आहे. त्या नुकसानी मधून शेतकरी व कामगार वर्गाला बाहेर काढण्यासाठी "आत्मनिर्भर भारत अभियानाच्या अंतर्गत 3 करोड शेतकऱ्यांना 4.22 लाख करोड रुपयाचे कृषी कर्ज दिले गेले. तसेच कर्जफेडीसाठी देण्यात येणाऱ्या हप्त्यामध्ये 31 मे 2020 पर्यंत मुदत वाढ देण्यात आली आहे.सरकारकडून सांगण्यात येते की मार्च आणि एप्रिल च्या मध्ये 86600 करोड रुपयाचे 63 लाख कर्ज कृषीसाठी देण्यात आले आहे.तसेच सहकारी बँक आणि विभागीय ग्रामीण बँका रिफाईनेसिंग यासाठी नाबार्ड बँकेने 29500 करोडो रुपये दिले आहेत त्याच बरोबर राज्यातील पायाभूत सोयीसुविधा विकासासाठी 4200करोड रुपयांची मदत देण्यात आली आहे"2

कोविड-19 च्या काळात शहरी भागामध्ये काम करणारे अनेक ग्रामीण कामगारांना कारखाने बंद झाले व इतर क्षेत्रातील रोजगार मिळणे बंद झाल्यामुळे परत ग्रामीण भागाकडे परतावे लागले आहे, त्यांना आपल्या राहत्या गावांमध्ये रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी मनरेगा साठी निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे."मनरेगाच्या मदतीने ग्रामीण भागामध्ये पायाभूत सोयी सुविधांची निर्मिती करणे व रोजगार निर्मिती करणे या उद्देशाने केंद्र सरकार यांनी 13 मे पर्यंत 14.62करोड मनुष्य दिवस कामाची निर्मिती करण्यात आली. या तारखेपर्यंत वास्तवस्थित मनरेगावर10000 हजार करोड रुपये खर्च करण्यात आला आहे.आतापर्यंत 1.87 लाख ग्रामपंचायतीमध्ये 2.33 करोड लोकांनी आपल्या नावाची नोंदणी केली आहे त्यांना रोजगार प्राप्त झाला आहे. 2019 च्या तुलनेत 2020 मध्ये 50 टक्के जास्त लोकांनी आपल्या नावाची नोंदणी केली असून अशा सर्व लोकांना रोजगार प्राप्त झाला आहे."3 मनरेगाच्या मदतीने ग्रामीण भागात पायाभूत सुविधांची निर्मिती आणि रोजगार निर्मितीवर भर देणे हे दोन्ही उद्देश याठिकाणी साध्य झाल्याचे दिसून येतात. केंद्र सरकारने श्रमिकांच्या विकासासाठी नवीन श्रमिक कोड तयार करण्यात केला आहे. या कोड मुळे देशातील मजुरांना संपूर्ण देशामध्ये किमान मजुरी दरावर रोजगार उपलब्ध होऊन श्रमिकांना एकाच वेळी मंजुरी देण्यात यामुळे



Assistant Professor
Shivaji College, Hingoli.
Tq.& Dist.Hingoli.(MS.)

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal
Impact Factor - (SJIF) - 6.625 (2019),
Vol. 7, Issue 4
Peer Reviewed Journal
E-ISSN : 2348-7143
Oct.-Nov.-Dec. 2020

सोयीस्कर होईल.याचा फायदा 30 टक्के कामगार घेऊ शकतात यासाठी कामगारांना नियुक्त पत्र देण्यात येणार आहे.

**उद्योग व सेवा क्षेत्र:**

कोविड-19 च्या काळात देशातील सर्वच राज्य व केंद्र सरकारच्या उत्पन्नामध्ये घट झाली आहे.आर्थिक समस्यांना सामोरे जावे लागत आहे. अशा स्थितीत केंद्र सरकारने आत्मनिर्भर भारत अभियान अंतर्गत "वित्त मंत्रालयद्वारा 9879 करोड रुपये भांडवली खर्च करण्याची 27 राज्यांना अनुमती दिली आहे.आतापर्यंत 4939.8 करोडो रुपये निधी सर्व राज्यांना पहिला हप्ता म्हणून प्रदान करण्यात आला देशातील तामिळनाडू राज्य सोडून इतर सर्व राज्य याचा लाभ घेत आहेत."4 आत्मनिर्भर भारत रोजगार योजना अंतर्गत संघटित क्षेत्रात जास्तीत जास्त रोजगार निर्माण करण्यावर भर देण्यात आला आहे की,ज्या ठिकाणी जास्तीत जास्त लोकांना कर्मचारी भविष्य निर्वाह निधी सोबत जोडल्या गेलेले आहेत. आर्थिक वृद्धी होऊन रोजगार निर्मितीला चालना देण्याच्या उद्देशाने कोळसा,हवाई वाहतूक,संरक्षण साहित्य उत्पादन यामध्ये संरचनात्मक सुधारणा करण्यात आल्या आहेत.त्यामध्ये "संरक्षण क्षेत्रातील उत्पादनांमध्ये विदेशी गुंतवणूक 49 टक्क्यांवरून 74 टक्के पर्यंत वाढवण्यात आली आहे.खाजगीकरणावरही मोठ्या प्रमाणात भर देण्यात आला आहे.त्यामध्ये देशातील 12 विमानतळाचे खाजगीकरण करण्याचे निश्चित करण्यात आले आहे. कोळसा खाणीचे ही खाजगीकरण करण्यावर भर देण्यात आला आहे. औद्योगिक वसाहती निर्मितीवर भर देण्यात आला त्यामध्ये देशातील पाच लाख हेक्टर क्षेत्रावर 3376 औद्योगिक वसाहती निर्माण केल्या जाणार आहेत".5 अशाप्रकारे भारतीय अर्थव्यवस्थेला कोविड-19 या महामारी मंदीच्या अवस्थेमधून बाहेर काढण्याचा प्रयत्न आर्थिक पॅकेज च्या मदतीने सरकारकडून केला जात आहे यामुळे भारतीय अर्थव्यवस्थेत भविष्यात निश्चितपणे विकासाचा दर वाढेल, रोजगार वृद्धी होईल आणि मंदी ची अवस्था दूर होऊन देशाच्या एकूण राष्ट्रीय उत्पन्नात वाढ होईल.

**निष्कर्ष**

1) कोबिर 19 या जागतिक महामार्गामुळे अर्थव्यवस्थेतील नुकसान झालेल्या विविध क्षेत्राला आत्मनिर्भर भारत या योजनेअंतर्गत सरकारकडून संजीवनी देण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.
2) आत्मनिर्भर भारत अभियानामध्ये सरकारनी कर्ज वाटपावर मोठ्या प्रमाणात भर दिला आहे.
3) शासकीय किंवा सरकारचे गुंतवणूक विषयक भूमिका प्रत्यक्ष दिसून येत नाही.
4) शासनाकडून कर्ज वाटप ऐवजी प्रत्यक्ष गुंतवणूक करणे अपेक्षित आहे परंतु हे होतांना दिसून येत नाही.
5) सरकारने आत्मनिर्भर भारत अभियानामध्ये खाजगी गुंतवणूक व खाजगीकरण यावर भर दिलेला दिसून येतो.

**सारांश**

कोविड-19 या जागतिक महामारीच्या कालखंडामध्ये भारतीयअर्थव्यवस्थेतील विविध क्षेत्रावर विपरीत परिणाम झाले आहेत. अनेक लघु, कुटीर व मोठे उद्योग कमी अधिक प्रमाणात मध्ये बंद करण्यात



Assistant Professor
Shivaji College,Hingoli.
Tq.& Dist.Hingoli.(MS.)

E-ISSN : 2348-7143
Oct.-Nov.-Dec. 2020

आले.त्याचबरोबर वाहतूक दळणवळण व इतर सेवा क्षेत्रही पूर्णतः काही महिन्यामाठी बंद करण्यात आले. म्हणजेच संपूर्ण देश हा लोक डाऊन करण्यात आला आहे.यामुळे समाजातील अनेक लोकांचा रोजगार संपुष्टात आलाआहे. बेकारांची संख्या देशांमध्ये मोठ्या प्रमाणात वाढली आहे. समाजामध्ये बेकारीमुळे दारिद्रय व उपासमारीची वेळ समाजातील अनेक लोकांवर आल्याचे दिसून आले. अर्थव्यवस्थेत एकंदरीत मंदीची अवस्था निर्माण झाली आणि देशाच्या जी.डी.पी. दरा मध्ये त्याच बरोबर एकुण विकासाच्या दरामध्ये घट झाली.या अवस्थेतून अर्थव्यवस्थेला बाहेर काढण्याच्या उद्देशाने आणि देशाला आत्मनिर्भर बनवण्याच्या उद्देशाने भारताचे पंतप्रधान मा.नरेंद्र मोदी यांनी आत्मनिर्भर अभियानाची घोषणा केली आणि या घोषणा मध्ये 20लक्ष कोटी रुपयाच्या आर्थिक पॅकेजची घोषणा केली. या पॅकेज मध्ये अर्थव्यवस्थेतील कुटीर, लघु व मोठे उद्योग त्याचबरोबर कृषी क्षेत्र,सेवाक्षेत्र व इतर अर्थव्यवस्थेच्या विकासामध्ये महत्त्वपूर्ण भूमिकाअसणाऱ्या घटकांना त्याचबरोबर बँकांना निधीची उपलब्धता करून देण्यात आला. पॅकेजच्या आधारे देशांमध्ये निर्माण झालेली मंदीच्या अवस्था दूर करण्याचा प्रयत्न सरकारकडून करण्यात आला आहे. या आर्थिक पॅकेजचा अभ्यास करत असताना असे दिसून आले की,शासनाकडून देण्यात येणारा निधी हा तो कर्ज स्वरूपामध्ये दिल्या जात असल्याचा दिसून येतो. त्यामध्ये सरकार कडून उद्योग,व्यवसाय, सेवा क्षेत्र व इतर अर्थव्यवस्थेतील महत्त्वपूर्ण घटक यांना अर्थसाह्य म्हणून दिलेली मदत किंवा प्रत्यक्ष केलेले अर्थसाह्यचे प्रमाण अतिशय अल्प आहे.तर कर्जाची प्रमाण मात्र जास्त आहे.यामुळे या आर्थिक पॅकेजचा लाभ किती प्रमाणात अर्थव्यवस्थेच्या विकासासाठी आणि मंदीची अवस्था दूर होण्यासाठी होईल हा प्रश्न वाटतो कारण मंदीच्या अवस्थेत मध्ये सरकारनी स्वतः पुढे येऊन प्रत्यक्ष गुंतवणुकीमध्ये वाढ करणे अपेक्षित असते कारण या कालखंडामध्ये नफ्याचा दर हा कमी असतो आणि त्यामुळे खाजगी गुंतवणुकदार समोर येण्याची स्थिती नसते अशा काळात सार्वजनिक गुंतवणूक म्हणजेच सरकारची भूमिका महत्त्वाची असते.पण या ठिकाणी सरकारची गुंतवणूक विषयक भूमिकाअतिशय अल्प किंवा नसल्याचेही दिसून येते. दुसऱ्या बाजूने सरकारने खासगीकरणाकडे आपला मोर्चा वळवल्याचा दिसून येतो. त्यामध्ये सुरक्षा विभाग देशाचे संरक्षण यामधील विदेशी गुंतवणूक व खाजगी गुंतवणूक यांचे प्रमाण वाढवले त्याचबरोबर कोळशाच्या खाणी,विमानतळ यांचे खाजगी करण्याचे नियोजन यामध्ये त्यांनी जाहीर केले आहे. अशा पद्धतीच्या आर्थिक नियोजनामुळे भारत किती प्रमाणामध्ये आत्मनिर्भर बनू शकते हे येणारा भविष्यकाळात सांगू शकतो.

**संदर्भ सूची**

1. www.financialexpress.com
2. m.economicstimes.com
3. कित्ता
4. https://pmmodiyojana.in
5. https:m.youtube.com

Assistant Professor
Shivaji College, Hingoli.
Tq.& Dist.Hingoli.(MS.)



55